दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ३६ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.२३ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.
Scan QR code to visit... Epaper Portal
Scan QR code to visit... Epaper Portal

# २५ ऑक्टोबरपासून आमरण उपोषण; गावात राजकीय पुढाऱ्यांना प्रवेश बंदी- मनोज जरांगे

## मराठा आरक्षण- आंदोलनाची पुढील दिशा ठरली

**जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिलेली २४ ऑक्टोबरची डेडलाईन संपायला अवघे दोन दिवस उरले आहेत. त्याआधीच मनोज जरांगे पाटील आपल्या लढ्याची नवी दिशा निश्चित केली असून २४ तारखेला न्याय न मिळाल्यास २५ ऑक्टोंबरपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी सरकारला दिला आहे. या उपोषणादरम्यान पाणी, औषधे काहीही घेणार नाही. हे कठोर उपोषण असणार, असे मनोज जरांगे यांनी स्पष्ट केले. तसेच प्रत्येक नाक्यावर साखळी उपोषण करणार असून हे युद्ध सरकारला पेलणार नाही. असे जरांगे पाटील म्हणाले आहेत.२४ तारखेला जर न्याय मिळाला नाही तर २५ तारखेपासून आमरण उपोषण करणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले आहे. आरक्षणाचा प्रश्न सुटेपर्यंत गावात राजकीय पुढाऱ्यांना प्रवेश बंदी करण्यात आल्याचेही मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. तर राज्यभर साखळी उपोषण करणार असून प्रत्येक नाक्यावर उपोषण होईल अशी माहिती त्यांनी आज पत्रकार परिषदेत दिली आहे.दरम्यान मनोज जरांगे पाटील पुढे बोलताना म्हणाले की, २८ तारखेपासून आमरण उपोषणाचे रुपातंर हे आमरण उपोषणात करण्यात येईल अशी रणनिती जरांगे पाटलांनी सांगितली आहे. शांततेत सुरू होणारे आंदोलन सरकारला झेपणार नाही, या विषयाची तुम्ही गांभीर्याने दखल घ्या, आणि २४ तारखेपर्यंत आरक्षण लागू करावे अशी मागणी यावेळी बोलताना त्यांनी केली आहे.मनोज जरांगे पाटील म्हणाले की, सरकारने आरक्षण घेऊनच गावात यायचे नाहीतर गावात यायचे नाही, असा इशारा देतानाच कुणही उग्र आंदोलन करु नये, आमचे त्याला समर्थन नाही असे त्यांनी स्पष्ट केले आहे. तरुणांनी आत्महत्या करु नये तुमच्या सर्वांची आम्हाला गरज आहे. आमरण उपोषणात अन्न-पाणी, वैद्यकीय सेवा घेणार नाही, असेही त्यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले आहे. शांततेचे आंदोलनच आपल्या दारात आरक्षण घेऊन येईल, गरिबांना न्याय




देण्यासाठी सर्वांनी साथ द्यावी, असे आवाहन जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आता ईडब्लूएस चा नवा विषय आणत आहे. मात्र, आता आम्हाला आरक्षणाशिवाय काहीही सांगू नका. आरक्षण मिळाल्याशिवाय परिस्थिती बदलणार नाही. त्यामुळे आम्ही जे मागितलेय ते आम्हाला द्या, इतर काहीही सांगू नका. राज्यातील सरसकट सर्व मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्यावे, ही आमची मागणी आहे. तेच आम्हाला हवे आहे, त्याशिवाय आम्हाला काहीही नको. इतर काहीही सांगू नका. मराठ्यांशी दगाफटका करू नका, तुम्ही दिलेल्या शब्दांला जागा, आम्हाला आरक्षण हवे आहे, असा इशारा त्यांनी सरकारला दिला.मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आता आम्ही त्यांना पुरावे दिले आहेत. शिष्टमंडळ पाठवले आहे. तज्ज्ञही पाठवले आहे. त्यांना हवे असलेले सर्व आम्ही पुरवले आहे. त्यांना सर्व पर्याय दिले आहेत. कायद्याचेही पुरावे दिले आहेत. आरक्षण मिळण्याएवढे सबळ पुरावे आता आम्ही दिले आहे. त्यामुळे आता सबबी नको. आम्हाला आता फक्त आरक्षण हवे आहे. आम्हाला आता मलमपट्टी नको,कायमचा उपचार म्हणजे आरक्षण हवे आहे. आता सरकारच्या हातात दोन दिवस आहेत.या दोन दिवसात आम्हाला आरक्षण द्या, आमच्या नादी लागू नका. आम्हाला आरक्षण द्या, आमच्या भावनांशी खेळू नका, अशी विनंती सरकारला करत आहोत. आता आमचे तरुण शांत बसणार नाही. त्यामुळे हा प्रश्न आता मार्गी लावावा. आम्हाला आरक्षण द्या, आम्ही कोणालाही डोक्यावर घेऊ. मात्र, आम्हाला आरक्षण देणार नसाल, तर आम्हीही त्यांना आश्रय देणार नाही, असेही पाटील यांनी स्पष्ट केले.२५ तारखेपासून सर्व गावातून प्रत्येक सर्कलमध्ये साखळी उपोषण करण्यात येणार आहे. आम्ही ताकदीने साखळी उपोषण करू. त्यानंतर २८ तारखेपासून त्याचं रुपांतर आमरण उपोषणात होईल. सर्कल निहाय तयारी मराठा समाजाने केली आहे. सर्व गावांनी सर्कलच्या ठिकाणी कायमस्वरुपी बसून उपोषण करायचं आहे, असं जरांगे पाटील यांनी सांगितलं.

# राजे अम्ब्रिशराव आत्रामांच्या हस्ते आर्केस्ट्राचे उद्घाटन

**अहेरी । प्रतिनिधी**

बातकम्मा नवरात्रोउत्सवाच्या शुभपर्वावर येथील आलापल्ली येथे शुक्रवार २० ऑक्टोबर रोजी बातकम्मा नृत्यासह आर्केस्ट्राची धमाल झाली. आर्केस्ट्राचे उदघाटन माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी केले यावेळी बातकम्मा मंडळांचे सदस्य आणि मान्यवर उपस्थित होते.आर्केस्ट्राचे आयोजन बातकम्मा मंडळ आलापल्ली येथील आलापल्ली-मूलचेरा मार्गावरील वेलगुर रोड येथे बातकम्मा उत्सव शुभपर्वावर हे संपूर्ण क्षेत्रात सर्वात मोठे मंडळ म्हणून प्रसिद्ध असून माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी बातकम्मा मंडळाला भेट देत बातकम्माचे विधिवत पूजन केले ह्यावेळी मंडळाने राजेंचे जोरदार स्वागत करण्यात आले.या क्षणी लहानापासून मोठ्या पर्यंत सर्वांनीच राजेंसोबत सेल्फी काढत छायाचित्रे घेतली. यावेळी बोलतांना राजेंनी नवरात्रोउत्सव तथा बातकम्मा उत्सवाच्या सर्वांना शुभेच्छा



दिल्या तसेच ह्या पुढेही मंडळाला सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले.राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी याप्रसंगी आपल्या भागातील युवती व महिलांना मनोरंजना सह सुप्त गुणांना वाव मिळावा तसेच महिलांचे सांस्कृतिक व कलेचा विकास व्हावा यासाठीच बातकम्माच्या शुभपर्वावर आर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले असून बातकम्मा मंडळ आलापल्ली कडून एक सुंदर असे आर्केस्ट्राचे आयोजन करून माझ्या हस्ते उदघाटन करून मला मान आणि सन्मान दिला त्या करिता बातकम्मा मंडळाचे आणि आयोजकांना शुभेच्छा व्यक्त करून मोलाचे मार्गदर्शनही केले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक व आलापली परिसरातील प्रेक्षकगण उपस्थित होते.

# थोडा धीर धरा, सरकारला वेळ द्या, आरक्षण मिळणारच-मुख्यमंत्री शिंदे

**मुंबई-**'मराठा समाजाला आरक्षण मिळणार हा एकनाथ शिंदेंचा शब्द आहे', असं मुख्यमंत्री म्हणाले. मराठा समाजातील लोकांनी आत्महत्या करणे ही बाब अत्यंत दु:खद असल्याचे शिंदे यांनी म्हटले. तसेच मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे.यामध्ये 'अनेक कायदेशीर बाबी आहेत, त्या पूर्ण करण्याचं काम सुरु आहे', त्यामुळे मराठा समाजाच्या बांधवांनी थोडा धीर धरावा असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. मनोज जरांगे यांनी सरकारला दिलेलं अल्टिमेटम येत्या २४ तारखेला संपणार आहे. त्यानंतर त्यांनी आमरण उपोषणाची हाक दिली. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधत मराठा समाजाला वेळ देण्याची विनंती केली.आरक्षण देण्यासाठी सरकार सर्वोतेपरी प्रयत्न करत असल्याचे यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. मराठा समाजाला टिकणारं आणि कायद्याच्या



चौकटीत बसणारं आरक्षण देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. मी दिलेला शब्द पाळणारच. अतिशय संवदेनशील घटना घडतायत. त्यामुळे कुणीही टोकाचं पाऊल उचलू नये, असेही शिंदे म्हणाले.कुणबी प्रमाणपत्रावर युद्धपातळीवर काम सुरु असल्याचं यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सांगितलं. यावर बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, 'ज्याप्रमाणे सरकाराने शब्द दिला आहे त्याचप्रमाणे या मुद्द्यावर काम सुरुये. आपल्या मराठा समाजातील तरुणांचा जीव इतका स्वस्त नाही. म्हणून या तरुणांनी त्यांच्या घरच्यांचा विचार करायला हवा. मराठा समाजाला आरक्षण देण्याची जबाबदारी ही आमची आहे. त्यानुसार आम्ही मराठा समाजाला जास्तीत जास्त लाभ देण्याचे प्रयत्न करत आहोत. ''दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मी आम्ही मराठा समाजाच्या बाजूनेच आहोत. मी कोणतीही खोटी आश्वासनं देत नाही. त्यामुळे सरकार हे मराठा समाजाच्या बाजूने आहे. इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता कायद्याच्या चौकटीत बसणारं आणि टिकणारं आरक्षण हे मराठा समाजाला मिळेल', असा विश्वास यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं.सध्या राज्यात मराठा आरक्षणचा मुद्दा चांगलाच पेटला आहे. त्यातच मराठ्यांना आरक्षण मिळणारच असा शब्द यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलाय. तर दुसरीकडे मनोज जरांगे यांनी अल्टिमेटम संपल्यानंतर आमरण उपोषणची हाक दिलीये. यामध्ये आता सरकार कोणती भूमिका घेणार याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे.

# शहराच्या स्वच्छतेमध्ये सफाई कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची- डॉ.पी.पी.वावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

स्वच्छता हीच सेवा असून सफाई कर्मचारी स्वच्छतेचे काम करून देशाची मोठी सेवा करीत आहेत. शहर स्वच्छ ठेवण्यामध्ये सफाई कर्मचाऱ्यांची भूमिका ही सर्वात महत्त्वाची आहे. त्यामुळे त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे निर्देश राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी.पी.वावा यांनी दिले.

नियोजन भवन येथे जिल्ह्यातील सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध विषयांवर आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, मनपा आयुक्त विपिन पालीवाल, वनअकादमीच्या अपर संचालक मनीषा भिंगे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, नगर प्रशासन अधिकारी अजितकुमार डोके, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुरेश पेंदाम, शिक्षणाधिकारी (माध्य.) कल्पना चव्हाण, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक भास्कर



सोनारकर यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.डॉ. पी.पी.वावा म्हणाले, सर्वप्रथम येथील सफाई कर्मचाऱ्यांच्या असलेल्या समस्यांचे निराकरण प्राधान्याने करावे. स्थायी अथवा कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांना ओळखपत्र उपलब्ध करून द्यावे. त्यांचा ब्लड ग्रुप, इन्शुरन्स सुविधा, पीएफसह मासिक वेतन प्रमाणपत्र द्यावे. या कर्मचाऱ्यांना उत्तम आरोग्य सुविधा पुरवाव्यात तसेच आरोग्य तपासणीचे कॅम्प आयोजित करावे. आयुष्मान भारत योजनेचा लाभ द्यावा. कर्मचाऱ्यांचे किमान वेतन, कोर्ट व प्रलंबित प्रकरणांमध्ये त्वरित कार्यवाही करावी. येथील सफाई कर्मचाऱ्यांना वास्तव्यास राहण्यासाठी अजूनही पक्के घर नाही. त्यासाठी आवश्यकतेनुसार प्रधानमंत्री आवास योजनेतून घरे उपलब्ध करून द्यावी. ते पुढे म्हणाले, येथील सफाई कर्मचाऱ्यांच्या जात प्रमाणपत्राबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. हा त्यांचा परंपरागत व्यवसाय असल्याने त्यांना जात प्रमाणपत्र देण्याचे नियोजन करावे. रोजगार व स्वयंरोजगारासाठी बँकेमार्फत कर्ज सुविधा उपलब्ध करून द्यावी. सफाई कर्मचाऱ्यांच्या मुलां-मुलींना शिक्षणासाठी ५ टक्के आरक्षण तसेच शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येईल. तसेच शासनाच्या विविध विभागाच्या वतीने सफाई कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या स्वयंरोजगाराच्या व प्रशिक्षणाच्या योजनांचा लाभ मिळवून देत त्यांना मुख्य प्रवाहात आणावे, असेही ते म्हणाले. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असून त्यांना लागणारी कागदपत्रे, त्याच्या घरांचा प्रश्न देखील सोडविण्यात येईल, असे डॉ. वावा यांना आश्वासित केले. यावेळी सफाई कर्मचारी व पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या समस्या सदस्यांसमोर मांडल्या. या समस्यांचे निराकरण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# २४ ला ऐतिहासिक विजासन बुद्ध लेणी येथे भव्य धम्म मेला

**भद्रावती । प्रतिनिधी**

हजारो वर्षापासून शोषित, पिढीत अस्पृश्य समाजाला अंधकारातून प्रकाशाकडे नेणारे भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशातील जातीव्यवस्थेला मोडीत काढून अनुवादी व्यवस्थेला सर्वनाश करून आम्हाला आमच्या उद्धाराचा खरा मार्ग दाखविला तो म्हणजे बुद्धाचा धम्म .डॉ. आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयाया सोबत ऐतिहासिक नागलोण भूमी नागपूर येथे ही क्रांती केली याला ६७ वर्ष पूर्ण होत आहे त्या अनुषंगाने विजासन जय भीम पंच मंडळातर्फे धम्मचक्र प्रवर्तन दिन व विजयादिशमीनिमित्त भव्य धम्म मेलाचे आयोजन २४ ऑक्टोबरला ऐतिहासिक विजासन बुद्ध लेणी येथे करण्यात आले आहे.

दि. २४ ला दुपारी चार वाजता प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते शंकर मून यांचे शुभ हस्ते, नगरसेवक सुशील देवगडे यांचे अध्यक्षतेत होणार आहे. यावेळी मुख्य अतिथी म्हणून एडवोकेट भूपेंद्र रायपुरे, कुशल मेश्राम तर प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश रायपुरे, रत्नाकर साठे, सुरज गावंडे ,संदीप ढेगळे, विशाल बोरकर, उमेश रामटेके, डॉ. अमित नगराळे, बिपिन देवगडे, अजय लिहितकर ,राहुल सोनटक्के तर मुख्य उपस्थितीत शुक्राचार्य तेलतूबडे, उत्तम कुमरे, शांताराम बहादे, महादेव बेलेकर, धनपाल शेंडे आदींची उपस्थिती राहणार असून स्वागताध्यक्ष महेंद्र गावंडे राहतील. त्यानंतर सायंकाळी ७वा वाजता बुद्ध भीम गीताचा मधुर संगीतमय कार्यक्रम 'वादळ वारा' मुंबईचे सिनेस्टार अनिरुद्ध वनकर व त्यांचा संच सादरीकरण करणार आहे. उपरोक्त कार्यक्रमाला मोठ्या संख्येनी उपस्थित राहून लाभ घेण्याचे आव्हान विजासन जय भीम पंचमंडळाचे अध्यक्ष मिलिंद शेंडे ,सुरेश पाटील, अमित फुलझले, संघपाल वेले, जवाहर चहांदे आदींनी केले आहे.

# शहीदवीर बाबुराव शेडमाके चंद्रपूर जिल्ह्याचे वैभव,युवकांसाठी प्रेरणादायी असे कर्तृत्व-हंसराज अहीर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

कांतीकारी शहीदवीर बाबुराव पुल्लेश्वर शेडमाके ऐतिहासीक वारसा लाभलेल्या चंद्रपूर जिल्ह्याचे वैभव असून त्यांचे हौतात्म्य व राष्ट्रसमर्पित कर्तृत्व युवकांसाठी सदैव प्रेरणादायी राहील अशा गौरवपूर्ण शब्दात राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी शहीद दिनानिमित्त आयोजित श्रध्दांजली कार्यक्रमात शेडमाके यांच्या स्मृतीस आदरांजली वाहीली.

जिल्हा कारागृहातील पवित्र शहीदस्थळी शहीद दिनाचे औचित्य साधून दि. २१ ऑक्टोंबर रोजी आयोजित श्रध्दांजली कार्यक्रमात उपस्थित आदिवासी बांधव व अन्य नागरीकांना संबोधित करतांना ते बोलत होते. या प्रसंगी माजी उपमहापौर अनिल फुलझेले, बाबुराव शेडमाके समितीचे पदाधिकारी गुलाब मसराम, श्याम गेडाम, विठ्ठल कुमरे, गणेश गेडाम, बाबुराव जुमनाके, प्रमोद बोरीकर, किष्णा मसराम, साईराम मडावी, कमलेश आत्राम, रवी मेश्राम, अजय सोयाम, माजी





नगरसेविका ज्योती गेडाम, आदींची प्रमुख उपस्थिती होती.हंसराज अहीर म्हणाले की, शहीद बाबुरावजींची थोरवी महान स्वातंत्र्य योध्दयाची असल्याने त्यांच्या स्मरणार्थ केंद्रसरकारच्या सहकार्यातून टपाल तिकीट काढून त्यांच्या कार्यकर्तृत्वाला उजाळा देण्याचा अल्पसा प्रयत्न करू शकलो याचा विशेष आनंद आहे. तमाम लोकांसाठी ते आदर्श आहेत. जिल्ह्याच्या सुपूत्राने ब्रिटीशांविरूध्द कांतीची ज्वाला पेटवून हौतात्म्य पत्करले हे देशातील युवकांसाठी आदर्श व सदैव प्रेरणा देणारा ठेवा आहे. अहीर पुढे म्हणाले की, आदिवासी समाज नेहमीच देशभक्तीने प्रेरीत राहील्याने देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात भगवान बिरसा मुंडा, राणी दुर्गावती व अन्य ज्ञात अज्ञात नरवीरांच्या शौर्याच्या, हौतात्म्याच्या गाथा सुवर्णक्षरात कोरल्या गेल्या आहेत.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आतंकवाद्यांशी लढत आहेत. त्यामुळे अशा शहीदवीरांच्या शौर्याच्या इतिहासातून प्रेरणा घेवून देशाच्या रक्षणाकरीता राष्ट्रसमर्पित युवकांची देशाला गरज पडणार आहे. प्रधानमंत्री मोदीजी शहादत्व लाभलेल्या आदिवासींची माहिती जतन करण्याचे कार्य करीत आहेत. त्यांचे स्मारक उभे करण्याची त्यांची भूमिका असल्याचे अहीर यांनी याप्रसंगी सांगीतले. या कार्यक्रमास चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी बांधव बहुसंख्येनी उपस्थित होते.

# वीजबिलाचा सायबर करंट

**आज रात्री १० वाजता आपल्या घरची वीज कटणार आहे. आपला मोबाईल अपडेट नाही. ग्राहकांनी सोबत दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधावा असा मेंसेज आला तर ग्राहकांनी अशा मॅसेजला मुळीच प्रतिसाद देऊ नये. कारण महावितरण अशा मॅसेजच्या माध्यमातून ग्राहकांना कधीच धमकी देत नाही. ग्राहकांनो सतर्क रहा. सायबर चोरट्यांच्या जाळ्यात फसू नका.**






दिवसेंदिवस ऑनलाइन पैसे फसवणुकीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. सामान्य जनतेमध्ये सायबर संदर्भात नसलेली सजगता व अज्ञान याचा गैरफायदा घेत काही समाजकंटक मोबाईल/व्हाट्सअपच्या माध्यमातून रात्री वीज खंडीत करण्याचा धमकीवजा संदेश पाठवतात. ग्राहक गळाला लागला की, त्याच्याकडून आवश्यक माहिती घेत ओटीपी मिळवून समोरच्याच्या बँक खात्यावर डल्ला मारायचा अशा आर्थिक फसवणुकीच्या घटना अलिकडे वाढत असल्याचे कानावर येत आहे. सायबर गुन्हेगारांकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूकीचे गुन्हे घडत असले तरी अशा घटनांच्या संदर्भात प्रशासन गांभीर्याने लक्ष देत नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात गुन्हे वाढत आहे. घरातील वीज जोडणी तोडण्याचा थेट धमकीवजा मॅसेज देत हे अज्ञात गुन्हेगार ग्राहकांच्या बँक बॅलन्सवर डल्ला मारतात. बरेचदा अनेकांच्या व्हाट्सअपवर मेसेज आला असेल की,तुमचे मागील महिन्याचे वीज बिल भरलेले नाही. आपला मोबाईल क्रमांकही अपडेट नाही. त्यामुळे रात्री १० वाजता आपला वीजपुरवठा खंडित करण्यात येईल. ऑनलाइन अपडेटसाठी तात्काळ मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असा संदेश आला असेल. त्यात एक मोबाईल नंबर दिला जातो. संदेश वाचताच आपल्या घरातील वीज जोडणी तोडली जाणार या भितीने घाबरून ग्राहक गर्भगळीत होत संबंधित संपर्क क्रमांकावर फोन करतात.समोरील व्यक्ती आपण अधिकारी असल्याचे भासवून संवाद साधायला सुरुवात करतो. आम्ही तुमची वीज बिल अपडेट करून देतो त्यासाठी तो समोरच्या ग्राहकाला आवश्यक ती माहिती मागवून चालाकपणे ओटीपी जाणून घेतो. आणि बँक खात्यावर डल्ला मारतो. अशा प्रकारच्या घटना नेहमीच्याच झाल्या आहेत. म्हणून ग्राहकांनी सतर्क असणे आवश्यक आहे. एकदा माझ्याही मोबाईलवरती असा संदेश आला होता. परंतु मला या प्रकरणाची कल्पना असल्यामुळे समोरच्याला संपर्क करताना आपला ओटीपी सांगितला नाही. चर्चेत त्याच्याकडून काही तथ्य ऐकायला मिळाली. आपण सांगितले आम्ही तर आमचे बिल भरलेले आहे. तर ते त्या बिलाचा नंबर मागतात. बिलाविषयी सविस्तर जाणून माहिती जाणून घेतात. काही कार्यवाही करत असल्याचे भासवून आपल्याकडून ओटीपी मागतात. एकदा ओटीपी दिला की आपले बँक खाते खाली झालेच म्हणून समजा. सायबर संदर्भामध्ये सामान्य माणसांच्या मनामध्ये असलेल्या अज्ञानाचा चोरटे गैरफायदा घेतात. वीज बिलांच्या मॅसेज घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. हे गुन्हे उकल होण्याचे प्रमाण नगण्य असल्यामुळे गुन्हेगार निर्धावले आहे. ग्राहकांनी कधीही लक्षात घेतले पाहिजे की,एकतर वीज कंपनीकडून असा संदेश येतच नाही.आणि आलाही तरी अशा मॅसेजकडे लक्ष देऊ नये.गरज भासल्यास शहरातील महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा. यानिमित्ताने महावितरण कार्यालयाला सुद्धा सुचना करावीशी वाटते की, त्यांनीही नागरिकांमध्ये अशा संदर्भामध्ये सजगता येण्यासाठी नागरिकांसाठी सेमिनार, चर्चासत्र आयोजित करावे. पत्रकार परिषदेच्या माध्यमातून आपल्या ज्या सूचना असतील त्या नागरिकांपर्यंत पोहोचवाव्या.महावितरण बिलाच्या पेमेंटसाठी लिंक किंवा सॉफ्टवेअर डाऊनलोड करायला कधीच सांगत नाही. असे करणे ग्राहकांनीही टाळावे. कोणी मागितले तरी वैयक्तिक मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू नये. ऑनलाइन व्यवहार करायचा असेल तर एखाद्या आपल्या खास जवळच्या परिचित माणसाशी संपर्क साधावा. कधीही महावितरण मॅसेजमध्ये ग्राहकांना संपर्क करण्याविषयी सांगत नाही. रात्री १० वाजल्यानंतर घराची वीज तोडण्याची धमकी देत नाही. ग्राहकांनो जागे रहा, सतर्क रहा, सुरक्षित रहा.

# आपण काही करू शकत नाही



अनेक ठिकाणी अनेक गोष्टी घडताना आपण पाहतो. कुठं एखाद्या कार्यक्रमात धांगडधिंगा सुरू असतो, कुठं कार्यक्रमच उशिरा सुरू होतात, भाषेच्या बाबतीत विचारायलाच नको. 'स्वयंपाक' हा शब्दच विसरून गेल्यासारखा झाला आहे. हे सारं सारं आपण पाहतो आणि सोडून देतो; कारण एकच, काय करणार आपण?

आचार्य अत्रे जयंतीनिमित्त एका सोहळ्याला गेले होते. त्या सोहळ्याची सुरुवात महाराष्ट्र गीताने झाली. शाळेच्या छोट्या मुलांनी फार सुंदर गीत म्हटलं; परंतु त्याचं पहिलं कडवं वगळल होतं. ते कडवं आहे :

रेवा वरदा कृष्ण कोयना भद्रा गोदावरी
एकपणाचे भरती पाणी मातीच्या घागरी
भीमतडीच्या तट्टांना या यमुनेचे पाणी पाजा
जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा...

मला आश्चर्य वाटलं. सभागृहाबाहेर त्या मुलांना मी भेटले आणि विचारलं, 'पहिलं कडवं का वगळलं?' मुलं गोरीमोरी झाली. मी म्हटलं, 'बाळांनो, तुम्ही फार छान गायलात. तुमचे उच्चारही चांगले होते.' मुलांनी आपल्या शिक्षिकेकडं पाहिलं. त्या बाई म्हणाल्या, 'अहो, आता हे महाराष्ट्र गीत राज्य सरकारनं 'राज्य गीत' म्हणून घोषित केलंय आणि दोनच कडवी घ्यायला सांगितलंय.' मी चकित झाले. पहिल्या कडव्यात महाराष्ट्रातील मुख्या नद्या आहेत. त्या मुलांना सहज पाठ झाल्या असत्या. त्यातली रेवा म्हणजे नर्मदा, ती तर फार महत्त्वाची नदी. मराठ्यांनी अटकेपार झेंडा रोवला, त्याचा उल्लेख, 'तट्टांना या यमुनेचे पाणी पाजा' यात येतो. हे का वगळायचं? कवी राजा बढे, संगीतकार श्रीनिवास खळे, मूळ गायक शाहीर साबळे यांच्या आत्म्याला वेदना झाल्या असतील ना! इथं, आपण काही करू शकतो? नाही ना.कुसुमाग्रजांची 'अनामवीरा' ही कविता सातवीच्या पाठ्यपुस्तकात आहे. आपले किती जवान सीमेवर मृत्युमुखी पडले, याची आपल्याला माहितीच नाही; पण ही कविता ते जाणवून देते. यु-ट्यूबवर एका सातवीच्या शिक्षकानं ही कविता मुलांना म्हणायला लावून शिकवली, तेव्हा त्यांनी कवी लिहिण्याऐवजी 'लेखक कुसुमाग्रज' असं लिहिलं होतं. काय करणार आपण? काही करू शकत नाही.जवानांच्या संदर्भात एका सामाजिक कार्यकर्त्याला विदारक अनुभव आला. ते एका कार्यक्रमात पाहुणे म्हणून गेले होते. त्यांच्या हस्ते जवानांच्या पत्नीला भेटवस्तू द्यायची होती. जवानाच्या पत्नीचं नाव पुकारताच १०/१२ वर्षांची दोन मुलं व्यासपीठावर आली. मळके कपडे, चेहरेही भुकेनं व्याकुळलेले. त्यांनी ती भेट स्वीकारली. त्या पाहुण्यांनी (कार्यकर्ते) विचारलं, 'बाळांनो, तुम्ही का आलात? शाळा नाही का तुम्हाला?' मुलं रडवेली झाली; पण म्हणाली, 'आम्ही आईबरोबर मजुरीला जातो. शाळेत नाही जात. बरेच महिने झाले बाबांचं पेन्शन अजून मिळत नाही, म्हणून मजुरी करतो. आई आजारी आहे, म्हणून आम्ही आलो. पोटाला पुरेसं अन्न मजुरीतही मिळत नाही.' डोळे पाणावले ना? बघा आपण यासाठी काही करू शकत नाही. कुणाला याचा जाब विचारणार? कुठे आहेत त्या सीमेवर गेलेल्या जवानांच्या गावातील लोक, आमदार, खासदार? आपण काही म्हणू शकत नाही.इंग्रजांनी आपल्याला शिक्षणाचं महत्त्व पटवून, शिकायला प्रवृत्त केलं. त्यासाठी शाळा, महाविद्यालय, विद्यापीठं उभारली. जाताना तीन गोष्टी देऊन गेले, मद्य, क्रिकेट आणि इंग्रजी भाषा. या तिन्हीचा आपण पुरेपूर वापर करतो; पण त्यांनी वेळेचं महत्त्व सांगितलं, ते विसरलोच आपण! नाटकाचं महाग तिकीट काढा आणि वाट पाहा. जाहिरातीत व तिकिटावर वेळ दिलेली असते, चार वाजताची किंवा ८.३० वाजताची. नाटक कायम सुरू होतं अर्ध्या तासानं. तुम्ही वेळेवर येऊन बसा; पण हुषार प्रेक्षक चारची वेळ असेल, तर बरोबर पावणेपाचला येतात. नाटक सुरू झालेलं असतं. ते खुशाल रंगमंचासमोर अंधारात खुर्च्या शोधतात. मोबाइलचा दिवाही पेटलेला असतो. जे प्रेक्षक लवकर येतात, ते मूर्ख ठरतात. फक्त नटवर्य भालचंद्र पेंढारकर वेळेवर नाटक सुरू करीत. सध्या फक्त 'एनसीपीए' (टाटा थिएटर)मध्ये नाटक वेळेवर सुरू करतात. नाटकवाले वेळ का पाळत नाहीत? आपण काही करू शकत नाही. कारणं हजार असतात, ती आम्ही का ऐकायची? वेळ दिलीत ती पाळा की. तीच तऱ्हा कार्यक्रमांची. संगीताचा, पुस्तक प्रकाशनाचा, व्याख्यानाचा, मुलाखतीचा कोणताही कार्यक्रम दिलेल्या वेळेत सुरू होत नाही. वेळेवर समारंभाला पोहोचण्यासाठी घरातून लवकर निघालेले रसिक बावळट ठरतात. आपण काही करू शकत नाही.तीच तऱ्हा आपल्या माय मराठीची. भले आम्ही मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून दिल्ली दरबारी खेटे घालतो आहोत. त्यांच्या विनवण्या गेली दहा वर्षं करतो आहोत. मिळेल तेव्हा मिळेल अभिजाततेचा दर्जा; परंतु आपण मराठी भाषा नीट बोलतो आहोत का? कुसुमाग्रज सांगून गेले, 'आपणच आपल्या भाषेला आधार द्यायला हवा.' ते शब्दशः खरं आहे. आमचे नाटक, चित्रपट, मालिका वगैरेंमध्ये सतत लोकांना दिसणारे कलावंत (साहित्य निर्मिती करणारे लेखक, कवी लोकांच्या खिजगणतीत नसतात; कारण ते सतत समोर दिसत नाही) आणि राजकारणी मराठी भाषा नीट वापरतात? सध्या स्वयंपाक हा सुंदर मराठी शब्द या कलावंतांनी नामशेष केलाय. 'मी आज जेवण बनवलं', 'तुला कोण बनायचंय' वगैरे वाक्यरचना वापरून हे कुणाला बनवतात? 'मी स्वयंपाक केला/करीन/करते आहे', 'तुला कोण व्हायचं आहे?' या वाक्यरचना इतिहासजमा झाल्या आहेत. आमच्या कलावंतांना पाच मिनिटं नीट मराठी नीट बोलता येत नाही. त्यांना इंग्रजी शब्दांचा सतत आधार घ्यावा लागतो; शिवाय हल्ली नाटक, चित्रपट, पुस्तक यांची शीर्षकं इंग्रजी किंवा हिंदी असतात. इतके मराठी शब्द अस्तंगत झालेत?वेगवेगळ्या वाहिन्यांवरचे मराठी गाण्यांचे कार्यक्रम तर हिंदीची भ्रष्ट नक्कल असते. मोठेमोठे दिवे, चमकणारे सेट, परीक्षकांचे पोशाख. निवेदक/ निवेदिकांचे हिंदी चित्रपटाप्रमाणे पोशाख आणि चिमुकल्यांना गाणी देतात अर्थहीन. त्यांच्या वयाला न शोभणारी. त्यांच्या वयाचा विचार न करता. परीक्षक त्यांना 'रॉकस्टार' वगैरे न झेपणाऱ्या पदव्या देतात. या संपूर्ण कार्यक्रमात उत्तम असं मराठी गीत ऐकायला मिळतच नाही; नाह त्या मुलांना कवीच्या शब्दांचा आशय समजतो, ना संगीताचं महत्त्व. मराठीत मोरेश्वर पटवर्धन नावाच्या अवलियानं एक हजार अकरा गाण्यांची पुस्तकं प्रसिद्ध केली. त्यात कवी, संगीतकार, गायक यांची सूची दिली आहे. त्यातलं सुंदर असं एकही गाणं कधी या कार्यक्रमात ऐकू येत नाही. खरं तर संगीत ही गंभीरपणे घ्यायची गोष्ट आहे, तिथं फक्त हाहा हूहू चालतं. नाच केला जातो. संगीत ही कला इतकी सोपी आहे? पालकांनाही यात काही वाटत नाही? आपण काय करू शकतो? फक्त टीव्ही बंद.डॉ. अभय बंग महाराष्ट्राला 'मद्यराष्ट्र' म्हणतात. त्याचा प्रत्यय कलावंत आणि सामान्य माणूसही आणून देतो. नाटक, चित्रपट, मालिका वगैरेंमध्ये मद्याचा प्रसंग हवाच. विनोद निर्मितीसाठी त्याचा वापर केला जातो. इतके आपण रसातळाला जातोय. कवीश्रेष्ठ कुसुमाग्रजांचं 'नटसम्राट' हे नाटक, त्याला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. डॉ. लागूंनी अभिजात अभिनयानं नाटकाचा आशय सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवला; पण कुठल्या एका दुर्दैवी क्षणी एका दिग्दर्शकाला नाटकाचा चित्रपट करावा असं वाटलं आणि नाटकात नसलेला मद्य पिण्याचा प्रसंग त्यांनी चित्रपटात घातला. त्यात काम करणाऱ्या कलावंतांनाही त्याचं काही वाटलं नाही. सांगा आपण काय करू शकतो? काही नाही.स्त्रियांवर-मुलींवर होणाऱ्या अत्याचाराबद्दल 'ब्र'ही न काढलेला बरा! दिल्लीच्या कडक उन्हाळ्यात कुस्तीगीर मुलींनी आंदोलन केलं, लैंगिक छळ करणाऱ्या मंत्र्याबद्दल; पण पोलिसांनी त्या मुलींनाच झोडपलं. मणिपूरमधे धिंड काढली गेली; त्याचीही बातमी हादरवणारी होती. कितीही वाईट वाटलं, तरी आपण काही करू शकतो का? नाही ना! न्यायालयात याची दखल घेतली, म्हणून दिलासा मिळाला. इतकं तरी झालं. बाकी आपण हतबल नागरिक आहोत, मत द्या, गप्प बसा. पुढं काय घडतं पाहात बसा. असे अनेक प्रसंग, घटना प्रत्येक विचारी माणसाला जाणवत असतील. इथं काही गोष्टींची नोंद केली आहे. काळ बदलत चालला आहे. कुणाला काय हो त्याचं! आपण काही करू शकत नाही.वृत्तपत्रांत जाहिराती पाहतो. शाळा, महाविद्यालयं, विद्यापीठ यांच्या जाहिरातींत मराठीसाठी शिक्षक, प्राध्यापक हवेत असं कधी नसतं. मराठी भाषेची गरज कोणत्याच पदवी शिक्षणाला भासत नाही. (अपवाद बी.ए.ला मराठी घेणारी मुलं) मराठी मुलं, मराठीऐवजी फ्रेंच घेतात; कारण त्यात जास्त गुण मिळवणं शक्य होतं. मग मराठी भाषेच्या पेपरला जास्त गुण मिळतील असं का पाहिलं जात नाही? यात आपण काही करू शकत नाही.मराठी घरातले लग्न, अन्य सोहळे, कोणताही समारंभ असो, मराठी पदार्थ दिले जात नाहीत. पंजाबी, चायनीज, इटालियन वगैरे पदार्थ दिले जातात. लोक खातात. कुणी ब्र काढीत नाही. प्रत्येकानंच आपली भाषा त्यातल्या परंपरेतल्या सुंदर गोष्टींसह जपायला नको का? एक वाक्य बोलून आपण नामानिराळे. आपण काही करू शकत नाही!

# पोलिसांनी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करावा तसेच गुप्त खब-यांचे जाळे वाढवावे-ना.सुधीर मुनगंटीवार

## ना.मुनगंटीवार यांनी घेतला पोलिस विभागाचा आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्हा हा शांतता आणि सामाजिक सलोखा राखणारा जिल्हा आहे. मात्र काही असामाजिक तत्वांकडून जिल्ह्यात गुन्हेगारी वाढविण्याचे प्रकार निदर्शनास येत आहे. याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी गुप्त खब-यांचे जाळे वाढवावे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून दोषसिद्धीचे प्रमाण वाढवावे, असे निर्देश राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले. नियोजन सभागृह येथे पोलिस विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग तसेच उप-प्रादेशिक परिवहन विभागाचा आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रकुमार परदेशी, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., अतिरिक्त पोलिस अधिक्षक रिना जनबंधु, सहाय्यक पोलिस अधिक्षक आयुष नोपानी, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, राज्य उत्पादन शुल्क अधिकारी संजय पाटील यांच्यासह सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस निरीक्षक आदी उपस्थित होते. पुढे पालकमंत्री मुनगंटीवार म्हणाले, पोलिस विभागाने नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून गस्तीवर असणारे वाहन, पोलिस, कर्तव्यावर असलेला वाहतूक पोलिस नक्की कुठे आहे, यावरसुध्दा लक्ष ठेवावे. खब-यांचे जाळे वाढविण्यासाठी पोलिस मित्र/मैत्रीण नियुक्त करता येतात, याबाबत विचार करावा.जिल्ह्यातील जातीय सलोखा कायम ठेवण्यासाठी सोशल मिडीयावरील घटनांचे विश्लेषण करण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करावा. शहरातील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी बायपास मार्ग काढणे तसेच रस्ते कसे विकसीत करता येईल, याबाबत नियोजन करावे, अशा सुचना पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी दिल्या. सादरीकरणात जिल्हा




पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी म्हणाले, जिल्ह्यात ड्रंक न्ड ड्राईव्ह प्रतिबंध, सिटबेल्ट व हेल्मेट बाबत राबविण्यात आलेल्या त्रिसुत्रीच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे अपघातांची संख्या तसेच अपघातातील मृत्युंची संख्या कमी करण्यात यश आले आहे. सन २०२२ मध्ये ड्रंक न्ड ड्राईव्हचे ७६७ प्रकरणांची नोंद होती. यावर्षी सप्टेंबरअखेर पर्यंत ७७२१ प्रकरणे नोंदविण्यात आली आहे. यात ९०० टक्के वाढ आहे. सन २०२२ मध्ये सिटबेल्टची ७१४९ प्रकरणे तर २०२३ मध्ये १८२८१ प्रकरणे (१५६ टक्के वाढ), २०२२ मध्ये सिटबेल्टची १२०७९ प्रकरणे तर २०२३ मध्ये २७३०३ प्रकरणे (१२६ टक्के वाढ) नोंदविण्यात आली आहेत. या तीनही बाबींमध्ये गत वर्षीच्या एकूण १९९९५ प्रकरणांच्या तुलनेत २०२३ मध्ये एकूण ५३३०५ प्रकरणांची नोंद आहे.तसेच अवैध दारुला आळा घालणे, या प्रकणांत ४५ टक्क्यांनी वाढ असून २६३२ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. सन २०२२ मध्ये जनावरांची अवैध वाहतुकीची ३९ प्रकरणे होती. यावर्षी ६९ प्रकरणे नोंदविण्यात आली असून २२०० जनावरे पकडण्यात आली आहेत. सन २०१७ ते २०२३ या कालावधीत जिल्ह्यातील अल्पवयीन ३०० मुले आणि अल्पवयीन १२७१ मुली असे एकूण १५७१ जण बेपत्ता असल्याची नोंद झाली. यापैकी २९२ मुले तर १२३६ मुलींना परत आणण्यात यश प्राप्त झाल्याचे पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी सांगितले.

**रस्ते अपघातांची संख्या कमी करा :**
जिल्ह्यातील रस्ते अपघातांची संख्या कमी करण्यासाठी ब्लॅक स्पॉट निश्चित करून त्याच्या उपाययोजनेसाठी निधीबाबतचा प्रस्ताव रस्ता सुरक्षा समितीमध्ये तात्काळ पाठवावा. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांवरील खड्डे त्वरीत बुजवावे. अपघातांचे विश्लेषण करण्यासाठी सॉफ्टवेअर विकसीत करा. वाहनांच्या मागे रिफ्लेक्टर प्रभावीपणे दिसण्यासाठी वाहनांच्या तपासणीची मोहीम राबवावी. तसेच टोल नाक्यावर वाहनांच्या रिफ्लेक्टरची तपासणी करावी.

**हेल्मेट वापरण्याबाबत जनजागृती आवश्यक :**
सन २०२३ मध्ये दुचाकी अपघातात १६१ जणांचा मृत्यु झाला आहे. यात १५४ जणांचा मृत्यु हा हेल्मेट न वापरल्यामुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे हेल्मेट वापराबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. तसेच हेल्मेटचा वापर केल्याने किती जणांचे जीव वाचले आणि न वापरल्याने किती जणांचा मृत्यु झाला, याचा सर्व्हे करावा. हेल्मेट शिवाय (विशिष्ट क्रमांकासह) नवीन वाहनांची नोंदणीच करू नये, याबाबत नियोजन करता येते का, ते तपासावे.

**मिशन 'टीन्स' चे उद्घाटन :**
पोलिस अधिक्षक कार्यालय व जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने अल्पवयीन मुले / मुली यांना सायबर क्राईम, लैंगिक शोषण, बॅड टच – गुड टच, पोक्सो कायदा आदींबाबत जनजागृती निर्माण व्हावी, यासाठी 'टीन्स' उपक्रम (ट्रेनिंग, एज्युकेटिंग, इंपॉवरिंग, नर्चरींग स्टुडंट) राबविण्यात येत आहे. याअंतर्गत जिल्ह्यातील शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. जेणेकरून याबाबत शालेय विद्यार्थ्यांना अवगत करता येईल. तसेच याबा

**बाबुपेठ येथे पोलिस चौकी कार्यान्वित करणार :**
बाबुपेठ येथे असलेली पोलिस चौकी एक महिन्याच्या आत पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी पोलिस विभागाने आवश्यक मनुष्यबळाची पुर्तता करावी. या चौकीच्या बांधकामासाठी निधी लागत असल्यास तो उपलब्ध करून देण्यात येईल, असे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

**गोवंश ठेवण्यासाठी जागेची उपलब्धता :**
अवैध वाहतुकीदरम्यान पकडण्यात आलेली जनावरे ठेवण्यासाठी किती जागेची मागणी आहे, त्याबाबतचा प्रस्ताव तयार करावा. जागेची उपलब्धता करून देऊन त्याच्या बाजुला वनविभागातर्फे कुरण विकसीत करण्याचे नियोजन करता येईल, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

**दारू दुकानांची संख्या वाढवू नका :**
दारुमुळे अनेक कुटुंब उध्वस्त होतात. दारु दुकानांबद्दल नागरिकांच्या तक्रारी असल्यास त्याकडे गांभियाने लक्ष द्यावे. यापुढे जिल्ह्यात दारुच्या दुकानांची संख्या वाढवू नये, असे निर्देश पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाला दिले.

बत जे पिडीत आहेत, त्यांचे मनोर्धैर्य उंचाविण्यासाठी मानसोपचार तज्ज्ञांकडूनसुध्दा मार्गदर्शन करण्यात येईल. या उपक्रमाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

### माजी मंत्री बच्चू कडू करणार अयोध्या दौरा

## आर्थिक आरक्षणाची लढाई सुरू करणार- बच्चू कडू

**मुंबई–**प्रहारचे आमदार बच्चू कडू हे २९ ऑक्टोबर रोजी अयोध्येच्या दौऱ्यावर जाणार आहेत. याविषयीची माहिती बच्चू कडू यांनी माध्यमांशी बोलताना दिली. दरम्यान १५ ऑक्टोबरला मुंबईत बच्चू कडू यांनी मुंबईत 'मेरा देश मेरा खून' या मोहिमेची सुरुवात केली. या मोहिमेचा दुसरा टप्पा हा अयोध्येमध्ये होणार असल्याचं देखील यावेळी बच्चू कडू यांनी म्हटलं.राज्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा प्रभू श्रीराम चरणी बच्चू कडू मांडणार आहे. त्यासाठी त्यांच्या अयोध्या दौऱ्याचं आयोजन करण्यात आले आहे. सध्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आमदार बच्चू कडू यांनी आक्रमक पवित्रा घेतला असल्याचे चित्र आहे. तर अयोध्येला जाऊन शेतकऱ्यांसाठी प्रार्थना बच्चू कडू आणि त्यांचे कार्यकर्ते अयोध्येला जाऊन करणार आहेत.बच्चू कडू पुढे बोलताना म्हणाले की, आम्ही हजारोंच्या संख्येने अयोध्येला जाणार आहोत. या सरकारला बुद्धी दे ही प्रार्थना



आम्ही प्रभू श्रीरामाकडे करु. शेतकऱ्यांचा विचार करणारे आणि त्यांच्या हिताचे सरकार यावे असे मागण आम्ही तिकडे मागू. अयोध्येमधील शहिदांचे स्मारक व्हावे. यासाठी देखील आम्ही जात आहोत.बच्चू कडू म्हणाले की, शेतकऱ्यांच्या हिताचे सरकार यावे. शेतकऱ्यांच्या हिताचे धोरणे व्हावीत. यासाठी आम्ही अयोध्येच्या दौऱ्यावर जात आहे. अयोध्येमधील शहिदांचे स्मारक व्हावे. यासाठी देखील आम्ही जात आहोत. शेतकऱ्यांचे आणि शेतमजुरांचे आर्थिक आरक्षण निर्माण व्हावे. यासाठी देखील आमची लढाई असणार आहे. आमचे आंदोलन सरकारच्या विरोधात आहे की सरकारच्या बाजूने आहे हे सरकारने शोधावे. आम्ही मागणी करत आहोत. सरकारमध्ये आहे म्हणून मागणी करू नये, असा काही कायदा नाही. सरकारला वाटले की हे आंदोलन विरोधात आहे. तरी त्याची तमा नाही, असे बच्चू कडू यावेळी म्हणालेत.

## ज्यांना पक्ष उमेदवारीसाठी योग्य समजत नाही त्यांनी बारामतीची चर्चा करू नये–शरद पवार

**बारामती–**भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपच बारामती जिंकणार, असा विश्वास व्यक्त केला आहे. त्यावर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी बावनकुळे यांना जबरदस्त टोला लगावला आहे. तसेच देशात बारामतीचे महत्त्व आहे. बारामतीचे नाव घेतल्याशिवाय बातमी होत नाही. त्यामुळे अनेकजण बारामतीचे नाव घेत आहे, असेही शरद पवार म्हणाले.

दरम्यान शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, ज्या व्यक्तिला स्वत:चा पक्ष उमेदवारीसाठी योग्य समजत नाही. त्यांनी बारामतीची चर्चा करण्याचे काहीही कारण नाही, असा टोला शरद पवार यांनी लगावला. शरद पवार रविवारी बारामती दौऱ्यावर होते. त्यावेळी त्यांनी भाजपवर टीका करत बावनकुळे यांना टोला लगावला.शरद पवार म्हणाले की, बारामतीचे नाव घेतल्याशिवाय बातमी होत नाही. अखंड देशाला बारामतीचे महत्व माहिती आहे. म्हणूनच ते वारंवार बारामतीचे नाव घेतात. त्यांनी बारामतीची चर्चा करण्याचे काहीही कारण नाही. त्यांना भाजपने तिकिट नाकारले. म्हणजे त्यांना पक्षच त्यांचा उमेदवारीसाठी योग्य समजत नाही. त्यामुळे त्यांनी बारामतीबाबत बोलू नये. तसेच त्यांच्याबाबत आपण बोलण्याचीही गरज नाही.शरद पवार म्हणाले की, सध्या निवडणुका लागलेल्या पाच राज्यांमध्ये भाजपला लोक बाजूला करतील असे चित्र आहे. सध्या बदल करण्याची भावना देशामध्ये आहे. देशातील ७० टक्के राज्यांमध्ये भाजप नाही. अन् जिथे या निवडणुका आहेत. या निवडणुकींचा कौल भाजपच्या विरोधात असल्याचे दिसते असे त्यांनी यावेळी सांगितले.शरद पवार म्हणाले की, जरांगे पाटील आणि



सरकारमध्ये काही सुसंवाद झाल्याचे व सरकारने वेळ घेतल्याचे दिसते. याबाबत सरकार काय करते आहे याकडे आमचे लक्ष आहे. या दोन दिवसानंतर सरकारची भूमिका स्पष्ट होईल असे दिसत आहे. यातून मार्ग निघाला, प्रश्न सुटला तर मनापासून आनंद होईल,असे पवार म्हणाले. कंत्राटी भरती बाबत पवार म्हणाले, मी मंत्रिमंडळाच्या बैठकीला जात नाही. जाण्याचे काय कारण नाही. महाराष्ट्रात दोन उपमुख्यमंत्री आहेत. एकाच मत तुम्ही सांगितले. दुसऱ्या उपमुख्यमंत्र्यांनी आज त्याच्यावर टिप्पणी केली आहे. त्यात हे स्पष्ट दिसते की ज्या वेळेला त्यासंबंधीचा निर्णय घेतला गेला. त्या निर्णयाच्या बैठकीला अनेक सहकारी हजर होते. ते आजही सरकारमध्ये आहेत. त्यावेळी त्यांची संमती होती. आज त्यासंबंधीचे भाष्य करत नाहीत. कंत्राटी कामगारांच्या संबंधीची अस्वस्थता कशाची होती. नोकरीमध्ये शाश्वती नाही. ठराविक काळासाठीच नोकरी आहे. दहा अकरा महिन्यांची नोकरी म्हटल्यानंतर त्या व्यक्तीच्या जीवनात स्थैर्य नाही. त्यामुळे अशा पद्धतीने जागा भरणे योग्य नाही, असेही ते म्हणाले.

## उद्धव ठाकरेंची दोन्ही मुले वाया गेली आहेत–नीतेश राणे

**मुंबई–**हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या ज्वलंत हिंदुत्वाच्या विचारांशी ज्यांनी गद्दारी केली, खुर्चीसाठी वडीलांच्या विचारांना तिलांजली देऊन कॉंग्रेसच्या दारी लोटांगण घातले, ज्यांना आपले घर नीट सांभाळता आले नाही, दोन्ही मुले वाया गेली आहेत, त्यांना ते संस्कार देऊ शकले नाही, तो व्यक्ती जर शिवतीर्थाच्या व्यासपीठावर येऊन मर्दानगीची भाषा करत असेल, तर लोक हसतील, अशी टीका भाजप आमदार नीतेश राणे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर केली आहे.दरम्यान पुढे बोलताना नीतेश राणे म्हणाले की, संजय राऊत यांना मी आठवण करुन देईन की राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जो कार्यकर्ता असतो तो कधीही हिंदुत्वाशी गद्दारी करत नाही, देशभक्तीच्या, राष्ट्रवादी विचारांशी कधीही प्रतारणा करत नाही, आपल्या आईवडिलांचे संस्कार कधी विसरत नाही, म्हणून संघाच्या मेळाव्यामध्ये जे विचारांचे सोने दिले जाते ते तुमच्या मालकाच्या शिवतीर्थावर होणार्या मेळाव्यामध्ये कधीच दिले जाणार नाही. कारण यावर्षी जे शिवतीर्थावर बोलणार आहे, ते एका बिघडलेल्या, नशेबाज, बलात्कारी मुलाचे एक भडकलेले आणि चिंतीत असलेले वडील आहेत. ते या मेळाव्याच्या निमित्ताने आपल्या मुलाला वाचवण्यासाठी शिवतीर्थावर बोलणार आहेत.आमदार नीतेश राणे म्हणाले की, मनोज जरांगे ज्या काही सभा घेत आहेत त्याप्रमाणे चांगल्याला चांगलं म्हणणं हा माणुसकीचा धर्म आहे, आणि दुसरीकडे



महायुती सरकार प्रामाणिक पद्धतीने मराठ्यांना प्रमाणपत्रं मिळावं यासाठी मंत्रालयात बैठका घेत आहेत. ते होत असताना उद्धव ठाकरेंच्या सरकारप्रमाणे आम्ही गप्प बसलेलो नाही. पण ईडब्ल्यूएस असेल, सारथी असेल अशा विविध महामंडळांच्या माध्यमातून मराठ्यांच्या मुलांना जी जी आर्थिक मदत मिळते ती सर्व हक्काने देण्याचं काम आमचं राज्य सरकार करत आहे. म्हणूनच, आमचं मर्द मराठा सरकार अशा जाहिराती छापू शकतं कारण आम्ही कोणाचीही फसवणूक केलेली नाही.नीतेश राणे म्हणाले की,मराठा आंदोलकांवर ज्या काही चुकीच्या केसेस होत्या त्या सगळ्या काढण्याचे काम आमच्या राज्य सरकारने केले आहे. जरांगे पाटलांना मी आवर्जून सांगेन की एका बाजूला मराठा आरक्षणाची मागणी तुम्ही करताय त्यासाठी सरकार तुमच्याबरोबर आहे. पण त्याचबरोबर मराठ्यांच्या हितासाठी सरकारने अनेक चांगली कामं केली आहेत, ती जेव्हा तुमच्या भाषणांमध्ये तुम्ही बोलायला लागाल तेव्हाच समाजाला विश्वास वाटेल की, हा माणूस चांगल्याला चांगले म्हणतो आणि ते म्हणणार्यालाच मराठा म्हणतात, हे जरांगे पाटलांनी लक्षात ठेवावे.

## शेतकऱ्यांची चेष्टा थांबवा, अन्यथा गंभीर परिणाम भोगावे लागतील:विजय वडेट्टीवार

**मुंबई–**केंद्रीय मंत्रिमंडळाने १८ ऑक्टोबरला हंगाम २०२४-२५ च्या रब्बी पिकांचे हमीभाव जाहीर केले. ही हमीभावाची वाढ केवळ कागदी खेळ आहे, असा आरोप राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. तसेच, शेतकऱ्यांची ही चेष्ठा थांबवा. अन्यथा सरकारला गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही वडेट्टीवार यांनी दिला आहे.विजय वडेट्टीवार यांनी ट्विट करत नुकत्याच जाहीर झालेल्या हमीभावावर टीकास्त्र सोडले आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले की, केंद्रीय मंत्रिमंडळाने १८ ऑक्टोबरला हंगाम २०२४-२५ च्या रब्बी पिकांचे हमीभाव जाहीर केले. ही हमीभावाची वाढ केवळ कागदी खेळ आहे. नऊ वर्षे जनता केंद्र सरकारला सहन करत आहे. हमीभावाचे गाजर दाखवून सरकारकडून शेतकऱ्यांची दिशाभूल करण्यात येत आहे.राज्यातील महायुती सरकारलाही हमीभाववरुन इशारा देताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, महायुती सरकारने शेतकऱ्यांची दिशाभूल करू नये. आता शेतकऱ्यांची चेष्टा थांबवावी. अन्यथा सरकारला याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.पुढे विजय वडेट्टीवार म्हणाले की, केंद्र सरकारचा हमीभावाचा दावा दिशाभूल करणारा आहे. सरकारचे आयात निर्यात धोरण चुकीचे आहे. पेरा वाढविण्याचे सरकारकडून आवाहन केले जाते पण खरेदीची हमी दिली जात नाही. शेतकऱ्यांना गेल्या नऊ वर्षात हाच अनुभव सातत्याने येत असल्याने सरकारवर आता विश्वास राहिला नाही.यंदा पाऊस नाही, दुष्काळी स्थिती आहे. धरणात पाणी नाही. उत्पादन वाढीवर मर्यादा येणार आहे. त्यामुळे सरकारने गांभीर्याने शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविले पाहिजेत, अशी भूमिका वडेट्टीवार यांनी मांडली आहे.विजय वडेट्टीवार म्हणाले, केंद्र सरकारच्या नकारात्मक भूमिकेमुळे शेतकऱ्यांना फायदा होत नाही. मे २०२२ मध्ये केंद्र सरकारने हरभरा खरेदी बंद केली. उद्दिष्ट पूर्ण झाल्याचा कांगावा केला. त्यामुळे चांगल्या प्रतीचा हरभरा पडून राहिला. एकीकडे केंद्राची खरेदी नाही, बाजारात दर नाही, अशी शेतकऱ्यांची अवस्था झाली. हरभरा उत्पादक शेतकरी अडचणीत आला. आता हरभऱ्याच्या हमीभावात २५० रुपयांची वाढ अपेक्षित होती. परंतु ती १०५ रुपये केली आहे. सूर्यफूल, मसूर सारख्या इतर शेतमाल उत्पादनाची अशीच परिस्थिती आहे. गहू, तांदळाचे हमीभाव समाधानकारक नाहीत. बाजारभावापेक्षा कमी दर असल्याने तिथे देखील शेतकऱ्यांचा भ्रमनिरास होणार आहे. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हमीभावाचे गाजर दाखवणाऱ्या सरकारला बळीराजा धडा शिकवेल, अशा शब्दात वडेट्टीवार यांनी सरकारवर सडकून टीका केली.

## अजित पवार अर्थमंत्री असताना फडणवीसांनी माझ्या मतदारसंघातील कामांचा निधी रोखला–आ.रोहित पवार

**मुंबई–**राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार रोहित पवार सातत्याने अजित पवार गटावर टीका करतात. मात्र, आता त्यांनी अजित पवार यांचे नाव घेत थेट फडणवीस यांच्यावर टीका केली आहे. त्यामुळे याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत.अजित पवार यांच्याकडे अर्थखाते असतानाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सांगण्यावरुन माझ्या मतदारसंघातील कामाला निधी देण्यात येत नसल्याचा आरोप राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. अजित पवार यांचा उल्लेख करत रोहित पवार यांनी फडणवीसांवर निशाणा साधला आहे.सत्तेत सहभागी झाल्यानंतर अजित पवार गटाच्या ९ आमदारांना मंत्रीपद देण्यात आले. तसेच अजित पवार यांना उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्रीपद मिळाले आहे. तसेच नुकतेच त्यांना पुण्याचे पालकमंत्री पदही देण्यात आले आहे. त्यामुळे राजकारणात अजित पवार यांचा दबदबा वाढत आहे. तसेच आमदार रोहित पवार सातत्याने भाजप आणि अजित पवार गटावर निशाणा साधतात. मात्र, अनेकदा अजित पवारांवर बोलण्याचे, थेट टीका करण्याचे ते टाळतात. आता, पुन्हा एकदा त्यांनी अजित पवार यांच्यावर थेट टीका करणे टाळले असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर आरोप केला आहे.माझ्या मतदारसंघातील कर्जत आणि जामखेड या दोन्ही ठिकाणच्या शासकीय रुग्णालयांचे काम अर्धवट होऊन निधीअभावी ठप्प झाले आहे. अर्थमंत्री अजितदादा आहेत, मात्र या रुग्णालयासाठी आपल्या संमतीशिवाय निधी द्यायचा नाही, अशा सूचना फडणवीस साहेब आपण दिल्यात. हा आपल्या समकक्ष असलेल्या अजितदादांच्या खात्यावर अंकुश ठेवण्याचा प्रकार असून तो योग्य वाटत नाही. दुसरे म्हणजे उपचाराअभावी एखाद्याचा



बळी गेल्यास त्याची जबाबदारी आपण आणि आरोग्यमंत्री घेणार का?, असा सवालही रोहित पवार यांनी ट्विटरवरुन उपस्थित केला आहे.राजकारण तर आपण नेहमीच एकमेकांच्या विरोधात करतो. पण, ते विचारांचे आणि तत्त्वांचे असावे. राजकारणापायी सामान्य माणूस भरडला जाऊ नये, हे आपल्यासारख्या मोठ्या नेत्याला सांगण्याची वेळ यावी, यापेक्षा दुर्दैव ते काय, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे. तसेच, हे शेअर केलेले फोटो बघितले तर इतके काम होऊनही १ रुपयाही निधी दिलेला नाही आणि अशीच अवस्था राज्यातील इतर २६ कामांचीही आहे. मायबाप सरकार हे आपल्याला तरी योग्य वाटतं का?, असा प्रश्न रोहित पवार यांनी फडणवीसांना उद्देशून केला आहे.

# माता महाकाली महोत्सवात ९ हजार ९९९ कन्यांचे कन्यापूजन आणि कन्याभोजन कार्यक्रम संपन्न

## तिस–या दिवशी प्रसिध्द गायिका वैशाली सामंत यांच्या कार्यक्रमाने महोत्सवात रंगत







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

श्री महाकाली माता महोत्सव समितीच्या वतीने आयोजित श्री माता महाकाली महोत्सवात ९ हजार ९९९ कन्यांचे कन्यापूजन आणि कन्याभोजन कार्यक्रम पार पडला. यावेळी सर्व शक्तीरुपी कन्यांचे मान्यवरांच्या हस्ते कन्यांचे पूजन झाले. तर कार्यक्रमाच्या तिसऱ्या दिवशी प्रसिध्द गायिका वैशाली सामंत यांच्या गीत गायनाच्या कार्यक्रमाने महोत्सवात रंगत भरली. श्री माता महाकाली महोत्सव धार्मिक व उत्साही वातावरणात पार पडत आहे. महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी रात्री आठ वाजता प्रसिध्द गायिका वैशाली सामंत यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांच्या गायन कार्यक्रमाने महोत्सवात रंगत भरली. यावेळी महोत्सव समितीचे अध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार, सचिव अजय जयस्वाल, सदस्य बलराम डोडाणी, मिलिंद गंपावार यांच्यासह ईतर पदाधिकाऱ्यांनी वैशाली सावंत यांना मातेची मुर्ती देत सन्मानीत केले. माता महाकाली महोत्सव हा नारीशक्तीचा जागर करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला कार्यक्रम आहे. यात चंद्रपूरकरांचा लाभत असलेला सहभाग कौतुकास्पद आहे. दरवर्षी आपण हे आयोजन करणार असल्याचे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. माता महाकाली महोत्सवात जिल्हाभरातील ९ हजार ९९९ कन्यांचे कन्यापूजन आणि भोजन कार्यक्रम घेण्यात आला. यात विविध शाळेतील विद्यार्थींनीही सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी महाकाली मंदिर परिसरात विशेष व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी कन्यापूजनानंतर शक्तीरुपी कन्यांना महोत्सव समीतीच्या वतीने भेटवस्तू देण्यात आली. या आयोजनात सहकार्य करणाऱ्या पालकांनाचेही समीतीच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. काल महोत्सवाच्या तिस–या दिवशी विधानसभा विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार आणि मनसे राजु उभंरकर यांनी महोत्सवाला भेट देत शुभेच्छा दिल्यात यावेळी श्री महाकाली माता महोत्सव समितीच्या वतीने मातेची मुर्ती देत त्यांचा सत्कार करण्यात आला. उद्या निघाणा–या नगर प्रदक्षिणा पालखी यात्रेने पाच दिवसीय महोत्सवाचा समारोप होणार आहे. हळदी कुंकुवाचा सडा टाकून पालखीचा मार्ग स्वच्छ केला जाणार आहे. या पालखी यात्रेत मंदिर अब बनने लगा है या गाण्याची सुप्रसिध्द गायीका ईशरत जॅहा यांचा रोड शो असणार आहे. सोबतच यात केदारनाथ धाम येथील झांज व डमरु पथक, पवनसुत हनुमान व वानरसेना, कानपूर येथील शिवतांडव व अघोरी नृत्य, उत्तर प्रदेश राज्यातील काली माता दृष्य, आदिवासी नृत्य, गंगा आरती, पालखीत तुतारी व अब्दारीचा समावेश, पालखीत पोतराजे नृत्य यांचा समावेश,चंद्रपूर शहरातील ८० वादकांचा जगदंब व अन्य ढोल ताशा व ध्वज पथकांचा समावेश, शहरातील बँड पथकांचा समावेश, पालखीत गायत्री मंदिर परिवारातील ५०० कलशधारी महिलांचा समावेश, पालखीत ५०० महिला व पुरुषांचे लेझीम पथक, डी. जे. धुमालचे विविध संच, शाळा, कॉलेज मधील विद्यार्थी- विद्याथ्र्याचे दृष्य समूह, डी. जे. चे विविध संच, महिला, पुरुषांचे दांडिया गरबा नृत्य समूह, १००९ महिला - पुरुषांचे योग नृत्य, १५१ मंडळांचे महिला - पुरुषांचे भजन समूह, नागपूर येथील विरांगण क्रीडा गृपच्या मुलांचे शस्त्र प्रात्यक्षिक, शहरातील अनेक सामाजिक संघटनांचा पालखीत सहभाग, शहरातील व्यायाम शाळांचा पालखीत सहभाग, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर आधारित दृष्य समूह, चंद्रपूर जिल्ह्यातील देवी - देवतांच्या मंदिरांचे दृष्य, श्री माता निर्मला परमेश्वरी भक्तांचा पालखीत समावेश,पारंपरिक खेळांचे पालखीत दृष्य, तेलगु समाजाचे बतुकम्मा दृष्य, पारंपारिक सण उत्सवांचे बोलके दृष्य, शहारातील तंट्या बिल व वाघोबांचा समावेश, मशाल पथक यांचा पालखीत समावेश, टांगता रोप मल्लखांब प्रात्यक्षिक समूह, चंद्रपूर यांचा पालखीत समावेश, स्थिर मल्लखांब प्रात्यक्षिक समूह, जोगदंड महाराज वारकरी शिक्षण संस्था, पंढरपूर यांचे १०८ वारकरी टाळ, मृदुंग, गर्जना समुह,स्वच्छता समूह यांचा पालखीत समावेश,बंगाली समाजातील महिलांद्वारा शंखनाद व पुरुषांद्वारा डंकनाद आदींचा समावेश असणार आहे.

### चंद्रपूरच्या युवकांनी बनवलेली हायड्रोजन कार ठरतेय आकर्षण

**चंद्रपूरातील कौशल समोर यावे या हेतुने चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यातील युवकांनी बनविलेली हायड्रोजन कार श्री माता महाकाली महोत्सव मध्ये ठेवण्यात आली आहे. आमदार किशोर जोरगेवार यांनी या कारची पाहणी करुन कार तयार करणा–या सर्व टिमचा सत्कार केला आहे.**

### महोत्सवात आयोजित आरोग्य शिबिरात हजारो लोकांची तपासणी

**श्री माता महाकाली महोत्सव येथे डॉ. आसावरी देवतळे यांनी आरोग्य शिबिर आयोजित केले आहे. या शिबिराचा हजाराहुन अधिक नागरिकांनी लाभ घेतला आहे. यात तपासणी नंतर औषधोपचारही केल्या जात आहे.**

# हिंगणघाट विधानसभा क्षेत्रातील महागाव पुनर्वसन येथील असंख्य कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

## आ.समिर कुणावार यांचे प्रमुख उपस्थितीत पक्ष प्रवेश सोहळ्याचे आयोजन

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक तसेच युवा कार्यकर्ते आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत.

२२ ऑक्टोबर रोजी हिंगणघाट, समुद्रपुर, सिंदी विधानसभा क्षेत्रातील महागाव पुनर्वसन येथील बहुसंख्य कार्यकर्त्यांनी आ. समीर कुणावार यांचा विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास तसेच कार्यसम्राट आमदार यांची कार्यशैली पहाता मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश केला.सदर प्रवेश सोहळा दि.२२ रोजी आ. समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात प्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले,याप्रसंगी प्रामुख्यानेसमीर धोटे, अभिषेक लाटणकर,




निखिल भोमले , प्रज्वल भगत, मंगेश ठवरी, आकाश बावणे, मोहन भगत, सागर भगत, कृष्णा बावणे, अभी लाटणकर, दीपक मोरे, प्रभाकरजी जीकार, संदीप वाघमारे, अनिल भगत, मंगेश जीकार , आयुष वानखेडे, अविनाश मुडे ,सागर सावरकर इत्यादी रीतसर कार्यकर्त्यांना भाजपात प्रवेश देण्यात आला.कार्यक्रम आमदार समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचेवेळी कार्यसम्राट आ.समीर कुणावार यांचेसह भाजपा जिल्हा उपाध्यक्ष किशोर दिघे, भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष अंकुश ठाकूर , भारतीय जनता पार्टी हिंगणघाट विधानसभा प्रमुख संजय डेहणे, माजी पंचायत समिती उपसभापती योगेश फुसे, बालू इंगोले, बलराम राऊत, युवा मोर्चा हिंगणघाट शहराध्यक्ष सोनू पांडे, प्रमोद नौकरकर, सनी बासनवार, अक्षय थूटे, ओम भोंमले इत्यादी पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते उपस्थित होते.

# निर्धारित वेळापत्रकानुसार बस पोहचाव्या अन्यथा आंदोलन करू : अभाविप



**बहुसंख्य विद्यार्थी नियमित शिक्षणाकरिता एस. टी. महामंडळ बस वर अवलंबून असतात ,मात्र या समस्या त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला बाधक असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे महामंडळाने याची गंभीर नोंद घ्यावी अन्यथा अभाविप आक्रमक भूमिका घेण्यास बाध्य असेल**

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

बस स्थानकावर निर्धारित वेळापत्रकानुसार एस. टी. बस उपलब्ध व्हाव्या अन्यथा तीव्र आंदोलन करू ,असा आक्रमक इशारा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदे कडून देण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून हिंगणघाट बसस्थानकावर वेळेवर गाड्या येत नसल्याने ग्रामीण भागातून प्रवास करत हिंगणघाटला शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयीन आणि शालेय विद्यार्थ्यांसमोर अनेक समस्या निर्माण झाल्या आहे. त्याचप्रमाणे काही गावांमध्ये एस. टी महामंडळाचा बस थांबा असून सुद्धा त्याठिकाणी गाडी थांबत नसल्याची गंभीर बाब समोर येताच अखिल भारतीय विद्यार्थी परिषद हिंगणघाट नगर शाखेच्या वतीने हिंगणघाट येथील आगार प्रमुखांना निवेदन देऊन लवकरात लवकर या समस्यांचे निराकरण करावे अशा मागणीचे निवेदन देण्यात आले. हिंगणघाट शहरातील अनेक शाळा–महाविद्यालयाचे विद्यार्थी ग्रामीण भागातून प्रवास करित शिक्षण घेतात ,परंतु एस. टी. बसच्या वेळा अनियंत्रित झाल्या आहेत. त्याचप्रमाणे काही गावांमध्ये एस. टी. बस थांबतच नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे याची गंभीर नोंद घेऊन समस्येवर तोडगा काढावा अन्यथा अखिल भारतीय विद्यार्थी परिषद तीव्र आंदोलनास बाध्य असेल असा इशारा सुद्धा निवेदनातून देण्यात आला आहे. या दरम्यान अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे हिंगणघाट नगरमंत्री सचिन पटेल ,नगर सहमंत्री मंगेश अरतपायरे व प्रणाली रघाटाटे तसेच गौरव मोहर्ले ,खुशी कचवे ,मानसी सुरपाम ,कार्तिक देशमुख ,तुषार अरतपायरे त्याचप्रमाणे अभाविप कार्यकर्त्यांसह संतप्त विद्यार्थी उपस्थित होते.

# आर्वीच्या डॉ.भूषण ठोंबरे यांना जागतिक यंग न्यूरोसर्जन पुरस्कार जाहीर

**आर्वी । प्रतिनिधी**

आर्वी सारख्या छोट्या शहरातून शिक्षण घेऊन पुढे



न्यूरो सर्जेरी मध्ये पदव्युत्तर व सुपर स्पेशालिटी अभ्यासक्रम पूर्ण करून त्यात संशोधनात्मक कार्य केलेल्या आर्वी येथील व सध्या अमरावती च्या पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय येथे कार्यरत डॉ. भूषण दिवाकर ठोंबरे यांच्या कार्याची दखल वर्ल्ड फेडरेशन ऑफ न्यूरो लाजिकल सोसायटी ने घेऊन त्यांना हा पुरस्कार जाहीर केला. यंदा जागतिक स्तरावर असे पाच पुरस्कार जाहीर झाले असून यात ब्राझील, रोमानीया,युगांडा,व युनाइटेड स्टेट च्या डॉक्टर चा समावेश आहे. भूषण याच्या ज्या संशोधनपर कार्यासाठी त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला, भूषण यानी आपले शालेय शिक्षण कृषक इंग्लिश स्कूल, आर्वी येथून केले, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथून एमबीबीएस टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज मुंबई येथून मास्टर ऑफ सर्जेरी एम आय एम एच ए एन एस , बंगलोर येथून एम सी एच हा सुपर स्पेशालिटी अभ्यासक्रम तर बॉम्बे हॉस्पिटल येथून फेलो शिप केली. तो आर्वी येथील प्रसिद्ध दंत चिकित्सक डॉ. दिवाकर व डॉ. शोभा ठोंबरे यांचा सुपुत्र आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.



चंद्रपूर येथील माता महाकाली महोत्सवात देवी पार्वतीच्या वेशभूषेत कु.परी धीरज चौधरी

# होय... आम्ही पदवीधर होणार!

## गोंडवाना विद्यापीठाचा 'विद्यापीठ आपल्या गावी' उपक्रम जिल्हा स्मार्ट ग्राम बिबी येथे पदवी अभ्यासक्रमाचे उद्घाटन





**कोरपना । प्रतिनिधी**

उच्च शिक्षणातील वाढती विद्यार्थी संख्येची गळती आणि सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विवंचनेमुळे उच्च शिक्षणापासून वंचित असणाऱ्या आणि उदरनिर्वाहासाठी संघर्ष करणाऱ्या युवकांना त्यांच्या गावातच उच्च शिक्षण प्राप्त होणार असून गोंडवाना विद्यापीठाच्या 'विद्यापीठ आपल्या गावी' या उपक्रमाअंतर्गत तयार करण्यात आलेल्या पदवी अभ्यासक्रमातून विविध रोजगारांची संधी प्राप्त होईल असा विश्वास गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी व्यक्त केला आहे.

जिल्हा स्मार्ट ग्राम बिबी येथे गोंडवाना विद्यापीठाचे घटक महाविद्यालय असलेल्या आदर्श पदवी महाविद्यालयाच्या वतीने ग्रामपंचायत बिबी व शरद पवार महाविद्यालय, गडचांदूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'विद्यापीठ आपल्या गावी' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. तीन वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या वर्गाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांचे हस्ते झाले. अध्यक्षस्थानी सरपंच माधुरी टेकाम उपस्थित होत्या. यावेळी विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.संजय गोरे, विद्यापीठाच्या मॉडेल कॉलेजचे प्राचार्य डॉ. शशिकांत आस्वले, विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे व डॉ. चंद्रमौली, उपसरपंच प्रा. आशिष देरकर, डॉ.नरेश मडावी, डॉ.माने यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी कुलगुरू पुढे म्हणाले या पदवी अभ्यासक्रमाच्या माध्यमातून बारावीनंतर शिक्षण सोडलेल्या युवकांच्या व युवतींच्या अंगभूत कौशल्यांचा विकास होणार असून त्यांना त्यांच्या आवडीचे शिक्षण प्राप्त होऊन त्यातून त्यांना पदवी आणि रोजगार प्राप्त होईल व त्यांचे सक्षमीकरण होईल असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला.उपसरपंच प्रा. आशिष देरकर यांनी ग्रामपंचायतीच्या विविध उपक्रमाची माहिती देऊन विद्यापीठाने दिलेला अभ्यासक्रम आम्ही शंभर टक्के यशस्वी करून दाखवू असा आशावाद व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय गोरे यांनी केले तर संचालन व आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.डॉ. शरद बेलोरकर यांनी केले. यावेळी यावेळी स्मार्ट ग्राम बिबी येथील ग्रामपंचायतचे सदस्य, अभ्यासक्रमाला प्रवेशित असणारे सर्व विद्यार्थी व गावातील ग्रामस्थ महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .